पोलंडचे पंतप्रधान भारत भेटीवर (21-23 ऑक्टोबर 2026)

पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरुन पोलंडचे पंतप्रधान महामहिम श्री. डोनाल्ड टस्क 21-23 ऑक्टोबर 2026 दरम्यान औपचारिक भारत भेटीवर असतील. पंतप्रधान डोनाल्ड टस्क यांच्यासमवेत श्री. आंद्रेज डोमान्स्की (अर्थ व वित्त मंत्री) तसेच बहुसदस्यीय उद्योजकांचे शिष्टमंडळ असेल. पोलंडचे पंतप्रधान म्हणून पंतप्रधान टस्क यांची ही दुसरी भारत भेट असेल. 2010 मधील त्यांच्या यापूर्वीच्या कार्यकाळात पहिली भेट पार पडली होती. पंतप्रधान टस्क यांनी 2017 मध्ये युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष म्हणून भारत-EU शिखर परिषदेसाठी नवी दिल्लीला भेट दिली आहे.

2. पंतप्रधान टस्क 22 ऑक्टोबर 2026 रोजी पंतप्रधान मोदी यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील, ज्यादरम्यान दोन्ही नेते द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण विस्ताराने आढावा घेतील, जे ऑगस्ट 2024 मध्ये पंतप्रधान मोदींच्या पोलंड भेटीदरम्यान धोरणात्मक भागीदारीपर्यंत उन्नत करण्यात आले होते. ते परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक विषयांवरही विचारांची देवाणघेवाण करतील. पंतप्रधान डोनाल्ड टस्क बंगळुरुलाही भेट देतील. IT आणि अंतराळ क्षेत्रांसह विविध व्यावसायिक भागधारकांशी संवाद साधतील. भारत-पोलँड बिझनेस फोरम नवी दिल्लीमध्ये 22 ऑक्टोबर आणि बंगळुरूमध्ये 23 ऑक्टोबर रोजी आयोजित केला जाईल.

3. या भेटीमुळे भारत-पोलंड धोरणात्मक भागीदारी अधिक मजबूत करण्याची आणि व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण, उदयोन्मुख तंत्रज्ञान, नूतनीकरणीय ऊर्जा, शिक्षण, संस्कृती आणि नागरिक परस्पर संबंधांसह परस्पर हिताच्या क्षेत्रांमध्ये सहकार्य पुढे नेण्याची संधी मिळेल. हे भारत-EU धोरणात्मक भागीदारी अधिक दृढ करण्यासाठी देखील काम करेल.

नवी दिल्ली

19 ऑक्टोबर 2026